दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १७० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२० सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## एसटीच्या ताफ्यात येणार 2000 गाड्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शहरापासून खेड्यापाड्यापर्यंत असलेल्या सर्वसाधारण प्रवाशांची आणि एसटी बस वाहतुकीची नाळ अधिक घट्ट करण्यासाठी एसटी महामंडळाने आपली कंबर कसली आहे. ७०० साध्या गाड्या लवकरच एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. या सोबतच दोन हजार गाड्या एसटीच्या ताफ्यात येणार असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली. एसटी महामंडळाच्या ताफ्यात १५ हजार ८७७ हजार गाड्या असून त्यापैकी १२ हजार ८२८ साध्या बस आहेत. याशिवाय ४२१ हिरकणी, २१७ विना वातानुकूलित तर उर्वरित वातानुकूलित बस, मिडी, मिनी बस आहेत. येत्या काही महिन्यांत साध्या बसची ही संख्या वाढणार आहे. एसटीमध्ये दोन हजार जुन्या गाड्यांची पुनर्बांधणी करण्यात आली.

# राहुल गांधी कॉँग्रेस अध्यक्ष बनणे जवळपास निश्चित

## महाराष्ट्र कॉँग्रेसनेही पारित केला प्रस्ताव



**दै.रायगड नगरी । मुंबई**

कॉँग्रेस पक्षाचा पुढील अध्यक्ष कोण होणार, हे आता जवळपास निश्चित झाल्यात जमा आहे. राहुल गांधी यांनीच पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारावे असा ठराव देभरातील सात राज्यांमधील कॉँग्रेस पक्षाने मंजूर केला आहे. आज मुंबईत झालेल्या प्रदेश कॉँग्रेस समितीच्या बैठकीत देखील राहुल गांधी यांनीच अध्यक्षपद स्वीकारावे असा ठराव करण्यात आला आहे. आतापर्यंत महाराष्ट्रासह एकूण ७ राज्यांमधील प्रदेश कॉँग्रेसेने राहुल गांधी यांना पाठिंबा दिला आहे. दरम्यान, १७ ऑक्टोबर रोजी कॉँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक होत असून राहुल गांधी हेच अध्यक्ष होतील हे निश्चित मानले जात आहे.


पक्षाने अशा प्रकारचे प्रस्ताव सन २०१७ मध्ये पारित केले होते. त्यानंतर राहुल गांधी अध्यक्ष बनले होते. मात्र, पुढे लोकसभा निवडणुकीत पक्षाला पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर राहुल गांधी यांनी अध्यक्षदाचा राजीनामा दिला होता. राजस्थान, गुजरात, तामिळनाडू, महाराष्ट्रासह एकूण ७ राज्यांनी राहुल गांधी यांनी अध्यक्ष बनावे यासाठी प्रस्ताव मंजूर केले आहेत.

महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीच्या नवनिर्वाचित प्रदेश प्रतिनिधींची बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीत दोन ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी, प्रदेश कोषाध्यक्ष, अखिल भारतीय कॉँग्रेस कमिटीचे प्रतिनिधी यांच्या निवडीचे अधिकार कॉँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांना देण्याचा ठराव प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मांडला. विधिमंडळ कॉँग्रेस पक्षाचे नेते माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी या ठरावाला अनुमोदन दिले व सर्व प्रदेश प्रतिनिधींनी हा ठराव एकमताने मंजूर केला. तसेच या बैठकीत खासदार राहुल गांधी यांनी कॉँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारावी अशी विनंती करणारा ठराव माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मांडला. प्रदेश कार्याध्यक्ष व माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे आणि नसीम खान यांनी या ठरावाला अनुमोदन दिले, हा ठरावही सर्व प्रतिनिधींनी एकमताने मंजूर केला.

प्रदेश निवडणूक अधिकारी पल्लम राजू यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीच्या नवनिर्वाचित प्रदेश प्रतिनिधींची बैठक यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली. या बैठकीला कॉँग्रेसचे सर्व महत्वाचे नेते उपस्थित होते.

कॉँग्रेस पक्षांतर्गत निवडणुक प्रक्रिया कार्यक्रम सर्वांच्या सहकार्यांने व्यवस्थित पार पडला असून पक्ष संघटना बळकट करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे असे प्रदेश निवडणूक अधिकारी व माजी केंद्रीय मंत्री पल्लम राजू यांनी सांगितले. राहुलजी गांधी यांनी कन्याकुमारीपासून भारत जोडो पदयात्रा सुरु केली आहे. या यात्रेत सहभागी होण्याचे आवाहनही पल्लम राजू यांनी यावेळी केले. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी ते काश्मीर सुरु असलेली भारत जोडो यात्रा ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात येणार आहे, या यात्रेच्या तयारीबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## ज्वेलर्समध्ये दरोडा; लाखोचा ऐवज लंपास



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहती मध्ये असलेल्या एका बंद ज्वेलर्सच्या दुकानात अज्ञात चोरटयांनी केलेल्या घरफोडीत लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे.

कामोठे वसाहती मधील बसंत बहार सोसायटीमध्ये असलेल्या लक्ष्मी ज्वेलर्समध्ये धाडसी चोरी करण्यात आली. अगदी फिल्मी स्टाईलने ही चोरी केल्याचे उघड झाले आहे. कामोठे वसाहतीमध्ये लक्ष्मी ज्वेलर्स नावाचे ज्वेलरी शॉप आहे. या दुकानावर चोरट्यांनी संध्याकाळी धाडसी दरोडा टाकला. यासाठी चोरट्यांनी ज्वेलर्स दुकानाच्या शेजारी असलेल्या एका खानावळ दुकानातील कॉमन भिंतीला भगदाड पाडून चोरटे सोनाराच्या दुकानात शिरले. यानंतर चोरट्यांनी गॅस कटरच्या मदतीने दुकानातील तिजोरी फोडली. तिजोरीतील चांदी आणि सोन्यावर चोरट्याने डल्ला मारून चोरटे फरार झाले. या दरोड्यामध्ये जवळपास १० किलो चांदी चोरल्याचे समोर आले आहे.

### दिवाळी बोनसचा आगळावेगळा आणि भूतो न भविष्यतो असा करार

## यंदा शेल इंडियाच्या कामगारांना मिळणार तब्बल १५ हजार रुपये बोनस



**दै.रायगड नगरी । पनवेल**

औद्योगिक क्षेत्रात विशेषतः पगारवाढ किंवा तत्सम करारनामा होत असतो. मात्र तळोजा औद्योगिक क्षेत्रातील शेल इंडिया मार्केट लिमिटेड कंपनीमधील कामगारांसाठी दिवाळी बोनसचा आगळावेगळा आणि भूतो न भविष्यतो असा करार झाला आहे.

या करारानुसार यंदाच्यावर्षी दिवाळी बोनस म्हणून प्रत्येक कामगाराला तब्बल ९५ हजार रुपये बोनस मिळणार आहे. विशेष हि बाब येथेच थांबली नाही तर पुढच्या वर्षी ०१ लाख ०५ हजार तर त्याच्या पुढील वर्षी ०१ लाख १५ हजार रुपये कामगारांना बोनस मिळणार आहे. आणि कामगिरी केली आहे ती आमदार प्रशांत ठाकूर व कामगारनेते जितेंद्र घरत यांनी. त्यामुळे दिवाळीच्या एक महिन्यापूर्वीच या कंपनीतील ४० कामगारांची दिवाळी झाली आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीत शेल इंडिया लिमिटेड नामक ऑइल कंपनी आहे. या ठिकाणी पूर्वी कामगार कॉँग्रेसची कामगार संघटना कार्यरत होती. मात्र कामगारांनी आपल्या न्यायिक हक्कासाठी शेल इंडिया एम्प्लॉईज संघटनेचे आधारवड म्हणून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांची सल्लागार तर अध्यक्ष म्हणून कामगारनेते जितेंद्र घरत यांच्या कार्याला पसंती दिली. देशातील सर्वात मोठा असलेला दीपावली सण

.../२

## ग्रामसेवक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी रमेश तारेकर यांची बिनविरोध निवड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका ग्रामसेवक संघटनेच्या अध्यक्षपदी रमेश नामदेव तारेकर यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे कोन ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच दिपक म्हात्रे यांनी सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपसरपंच शशिकला घरत, सदस्य घनश्याम पाटील, जितेश शिसवे, महेश माळी, जगन्नाथ सार्डेकर, ताईबाई पाटील, अनुषा म्हात्रे, दिपिका कांबळे, सुलोचना भागीत, आशा घरत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### संक्षिप्त...


## प्रियांका रावतच्या हत्येचा कट उघडकीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर गत गुरुवारी रात्री गळ्यावर वार करून हत्या करण्यात आलेल्या प्रियंका रावत या २९ वर्षीय महिलेच्या प्रकरणाचा छडा लावण्यात खान्देश्वर पोलिसांना यश आले आहे, ही हत्या प्रियंकाचा पती व त्याच्या प्रेयसीने सुपारी देऊन घडवून आणल्याचे तासात उघडकीस आले आहे. त्यानुसार पोलिसांनी प्रियंकाच्या पतीसह त्याच्या प्रेयसीला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी आता या हत्या प्रकरणातील मारेकरी व त्याच्या साथीदाराचा शोध सुरू केला आहे.

पनवेल तालुक्यातील विहीघर येथे राहणारी प्रियंका रावत ही ठाणे येथून लोकलने पनवेल रेल्वेस्थानकात उतरल्यानंतर रेल्वे स्थानकाच्या बाहेर दबा धरून बसलेल्या मारेकऱ्याने गर्दीमध्ये प्रियंकाच्या गळ्यावर वार करून तिची हत्या करून पलायन केले होते. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. दरम्यान पोलिसांनी देवव्रतसिंग व त्याच्या प्रेयसीला ताब्यात घेतले आहे. या दोघांनी ज्या मारेकऱ्यांच्या माध्यमातून ही हत्या घडवून आणली. त्या दोन मारेकऱ्यांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

## ठाकरे गट पुन्हा एकदा गाफिल राहिला ; दसरा मेळाव्याचे दुसरेही ग्राऊंड गेले



**दै.रायगड नगरी । मुंबई**

दसरा मेळाव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापू लागले आहे. शिवसेनेचा दसरा मेळावा कोण घेणार यावरून शिवसेनेचे शिंदे आणि ठाकरे गट पुन्हा एकदा भिडण्याची शक्यता आहे. बीकेसीतील एमएमआरडीएचे मैदान शिंदे गटाला देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आणखी एक मोठी माहिती हाती येत आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या गटाच्या हातून बीकेसीतील आणखी एक मैदान गेले आहे. ठाकरे गटाने अर्ज केलेले दुसरे मैदान कॉलिन्स इव्हेंट प्रायव्हेट लिमिटेड या इव्हेंट मॅनेजमेंट करणाऱ्या कंपनीला मिळाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे उद्धव ठाकरे गटाने दसरा मेळाव्यासाठी मैदान हवे म्हणून अर्ज करण्याच्या एक महिना आधीच या कंपनीने अर्ज केला होता. यामुळे या कंपनीला हे मैदान देण्यात आले आहे.

या मैदानावर ही कंपनी मोठे प्रदर्शन भरविणार आहे. यामुळे आता ठाकरे गटाला दसरा मेळाव्यासाठी मैदान शोधावे लागणार आहे. आणखी कोणती मैदाने मिळू शकतात, या शोधात आता शिवसेना नेते आहेत.

शिवसेनेच्या कामगार सेनेकडून बीकेसीतील कॅनरा बँकेजवळच्या मैदानासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. पण एका कंपनीकडून याआधीच कार्यक्रमासाठी ग्राऊंड आरक्षित केलेलं असल्यानं ठाकरेंना परवानगी नाकारल्याची

.../२

## अडीच कोटींचा रक्तचंदन साठा जप्त



**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए बंदरातून रक्तचंदनाच्या तस्करीचा सिलसिला कायम आहे. शनिवारी (१७) येथील सीमाशुल्क विभागाच्या डीआरआय विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईत विदेशात तारखिळ्यांच्या नावाखाली पाठविण्याच्या तयारीत असलेल्या एका कंटेनरमधून ३०३० किलो रक्तचंदनाचा साठा जप्त करण्यात आला आहे. या रक्तचंदनाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात अडीच कोटी रुपयांच्या घरात आहे.

जेएनपीए बंदरातून तस्करीच्या मार्गाने रक्तचंदनाचा साठा विदेशात पाठविण्याच्या तयारीत असलेल्याची गुप्त माहिती खबऱ्याकडून जेएनपीटी सीमाशुल्क विभागाच्या डीआरआय विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. डीआरआय विभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाईला सुरुवात करून, बंदरातून संशयित कंटेनरचा शोध घेऊन केलेल्या कारवाईत विदेशात पाठविण्याच्या तयारीत असलेल्या एका कंटेनरमधून ३,०३० किलो रक्तचंदनाचा साठा जप्त केला. कंटेनरमध्ये तीन पार्सलमध्ये हा रक्तचंदनाचा साठा लपवून ठेवला होता. तारखिळ्याच्या बनावट नावाखाली हा रक्तचंदनाचा साठा विदेशात

.../२

## माणगावमध्ये रुग्णांचे आरोग्य राम भरोसे

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कृपया रविवारी कोणीही आजारी पडू नका. काल माझी शुगर लेवल अचानक वाढल्याने प्रचंड अस्वस्थ वाटू लागलं. आदल्याच दिवशी एक नव नामांकित डॉक्टर यांच्या क्लिनिक मध्ये ई.सी.जी. काढला होता. शिवाय ते एम.डी. असल्याने त्यांना फोनही केला. अर्थात रविवार असल्याने त्यांनी प्रिस्क्रीप्शन पेपरवर इमर्जन्सी साठी दिलेल्या नंबर वर फोन केला. त्यांनी फोन तर उचलला, पण रविवार आहे हे माहीत असूनही फोन का केला, असं म्हणत ते माझ्यावर वैतागले. त्यानंतर माझे सहकारी नागेश सुर्वे यांच्या सोबत माणगांवातील प्रत्येक दवाखाना फिरुन पाहिला. रविवार असल्याने सर्व डॉक्टर्स हक्काच्या सुट्टीवर होते. माझं नशीब चांगलं म्हणून सुदैवाने अल्फा हॉस्पिटल मध्ये डॉक्टर रहाटविलकर यांची देवासमान भेट झाली.

हा अनुभव अनेकांना आला असेल. ज्यांची बड्या व्यक्तीं सोबत ओळख आहे, किंवा ज्यांची उपद्रव क्षमता जास्त आहे, त्यांच्यासाठी डॉक्टर्स कधीही उपलब्ध होऊ शकतात. इतरांनी चोवीस तास देवाच्या भरवशावरच रामभरोसे रहावं. एकाच दिवशी सर्व दवाखाने बंद ठेवण्यामागे नेमकं काय शास्त्र आहे? हे शोधायला हवं. माझ्या सारख्या सरकारी नोकरांना तर रविवार शिवाय कधीच मोकळीक मिळत नाही. त्याच दिवशी हा अघोषित बंद असतो. जो अनेकांच्या जीवावर बेततो. म्हणून सांगतो, कृपा करून रविवारी आजारी पडू नका. अशी कळकळीची विनवणी करीत माणगांव महसुल विभागाचे पुरवठा निरिक्षक अधिकारी (एस.आय.ओ.) संजय माने यांनी आपल्यावरील हा दुर्धर प्रसंग आमचेशी लिखीतपणे व्यक्त केला आहे.




या घटनेचे गांभिर्य माणगांव मधिल संबधित मेडिकल असोशिएशन व डॉक्टर्स सेलच्या मंडळीनी घ्यावी अशि माफक अपेक्षा माणगांवकर व्यक्त करीत आहेत. प्रत्येकाला कधिना कधी अशा प्रसंगातुन जावे लागत आहे. यासाठी आरोग्य विभाग नेमके काय उपाय योजना करणार ? असा सवाल ऐरणीवर आला आहे. शासनाचे लाखो रुपये आरोग्य विभागावर खर्च होतात. उपजिल्हा सारखे तथाकथीत अद्ययावत

.../२

# मराठवाड्याचे दुखणे

देशाच्या स्वातंत्र्यानंतर वर्षभराने निजामाच्या राजवटीतून मुक्त झालेला मराठवाडा आज एका वेगळ्या वळणावर उभा आहे. 'संतांची भूमी' असलेल्या मराठवाड्याला यापलीकडे दुसरी नवी आणि उमदी ओळख मुक्तीनंतरच्या गेल्या ७४ वर्षांत निर्माण करता आलेली नाही. हा या प्रदेशाचा सद्गुण असेलही; परंतु आहे त्यात समाधान मानण्याची अल्पसंतुष्टता हा अनेकदा दुर्गुण ठरतो. निजामाच्या हैदराबाद संस्थानातून मुक्त होऊन महाराष्ट्रात विनाशर्त सहभागी झालेला हा विभाग तुलनेने अद्याप मागासच आहे. औरंगाबाद आणि जालना यांचा अपवाद वगळता मराठवाड्यातील बहुतेक ठिकाणच्या औद्योगिक वसाहती ओस पडल्या आहेत. नवीन उद्योग येण्याची, स्थिरावण्याची चिन्हे नाहीत. अवर्षण आणि अतिवृष्टीच्या नैसर्गिक संकटाच्या चक्रव्यूहात शेती सापडली असून, तिची वाताहत झाली आहे. कापूस, मका आदींच्या उत्पादनाबाबत मराठवाडा अग्रेसर; परंतु सूतगिरण्या आणि मका प्रक्रिया उद्योग पश्चिम महाराष्ट्रात अशी स्थिती आहे. अनेक गावे उजाड पडली असून, ती भकास होत आहेत. औरंगाबाद, नांदेड, लातूर ही शहरे काही प्रमाणात फुगत असली, तरी विकासाची गती मंदच आहे. रस्त्यांचे जाळे विस्तारले; पण रेल्वेचे जाळे जेमतेम पसरले. शिक्षणाच्या सुविधा वाढल्या. शिक्षणाचा 'लातूर पॅटर्न' राज्यभर गाजला. मात्र, रोजगार नसल्याने तरुणांना पुणे, मुंबई, हैदराबाद, बेंगळुरू या ठिकाणी जाण्याशिवाय गत्यंतर नाही. पदवीधर तरुण असोत, की कुशल-अकुशल कामगार; मोठ्या शहरांतील प्रत्येक क्षेत्रात मराठवाड्यातील श्रमिक दिसतात. महानगरांत स्थलांतर हीच मराठवाड्याची अलीकडची ओळख बनली आहे. मुक्तिसंग्रामाचा अमृत महोत्सव साजरा करणाऱ्या मराठवाड्याचे वर्तमान हे असे आहे. भविष्याकडून विकासाबद्दल मोठ्या आशा आहेत; परंतु आजवरचा अनुभव पाहता त्या प्रत्यक्षात येण्याची शक्यता कमीच. प्रत्येक सरकारच्या काळात मंत्रिपदासाठी राबणारे लोकप्रतिनिधी एखादा उद्योग मराठवाड्यात आणण्यासाठी झटले असे झालेले नाही. 'स्टार्च' उद्योग सिल्लोड येथे सुरू करण्याची घोषणा भाजप-शिवसेना युती आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारांच्या कार्यकाळात झाली; पण उद्योगाची एक वीटही उभारली गेली नाही. 'ऑरिक'सारखा देशात अव्वल प्रकल्प उद्योगांची वाट पाहतो आहे; पण इथे उद्योग आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकार दोघेही पुढाकार घेताना दिसत नाहीत. मराठवाड्यातील शेतीचे वेगाने होणारे वाळवंटीकरण हा चिंतेचा विषय. मात्र, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात पुरेसे मनुष्यबळ नसल्याने यावर पुरेसे संशोधन होत नाही. या विद्यापीठाची शेकडो एकर जमीन पडीक आहे. अशा स्थितीत सामान्य शेतकऱ्यांच्या बांधावर विद्यापीठीय संशोधन कधी पोहोचणार? दुग्धव्यवसाय, फुलोत्पादन, फळबागा, कुक्कुटपालन अशा शेतीपूरक उद्योगांचा विस्तारही तोळामासा आहे. या बिकट परिस्थित पारंपरिक ज्ञानाला आधुनिक तंत्र जोडत काही शेतकरी शेतीचा डोलारा टिकवून ठेवत आहेत. राज्याचे २१ टक्के क्षेत्र मराठवाड्याने व्यापले आहे. मात्र, या भागाच्या विकासासाठी पुरेसा निधी दिला जात नाही. त्यासाठी राज्यकर्त्यांकडे हजार सबबी आहेत. औरंगाबादला दर वर्षी होणारी मंत्रीमंडळाची बैठक गेल्या काही वर्षांपासून गुंडाळली गेली. हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवाची सुरुवात शनिवारी झोकात झाली. औरंगाबादेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बैठक घेतील अशी अपेक्षा होती; पण मराठवाड्यात विकासकामांसाठी पावणेनऊ हजार कोटी रुपये निधी देण्याचे आश्वासन देऊन ते लगोलग हैदराबादला गेले. दर वर्षी मुक्तिसंग्राम दिनी अशा घोषणा ऐकणे जनतेच्या अंगवळणी पडले आहे. मराठवाड्याचा विकास अपेक्षित वेगाने नसण्याला येथील जनतेला आणि लोकप्रतिनिधींना जबाबदार धरावे लागेल. विकासाच्या मुद्द्यावर जनता एकवटत नाही आणि त्यामुळे लोकप्रतिनिधी पाठपुरावा करीत नाहीत, अशी स्थिती आहे. म्हणूनच त्यांचा भर विकासापेक्षा अस्मितेच्या मुद्द्यावर आहे. मराठवाड्यातील उद्योग इतरत्र हलविले, येथे होऊ घातलेले क्रीडा विद्यापीठ पळविले गेले; पण लोकप्रतिनिधींनी त्रागा केला नाही. प्रादेशिक अनुशेष भरण्यासाठी दर वर्षी परीक्षण आवश्यक असते. मराठवाड्याच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या मराठवाडा विकास मंडळाला मुदतवाढ मिळाली नाही. त्यातून परीक्षण आणि धोरण संपले. सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी तूर्तास धोरण निश्चिती नाही. जेमतेम १८ टक्के असलेले सिंचन क्षेत्र चाळीस टक्क्यांवर न्यायचे आहे. मात्र, तुटपुंज्या निधीमुळे उद्दिष्टपूर्ती नाही. विकासाची आणि पायाभूत सुविधांची वाताहत असताना धार्मिक आणि जातीय वादाची सुपीक शेती इथे डौलात आहे. जातीय, धार्मिक दुहीत सामाजिक पर्यावरण विभागले आहे. क्षमता गमावलेल्या नेत्यांच्या भाऊगर्दीत मराठवाडा स्वतःची ओळख शोधत आहे. निजामाच्या जोखडातून मराठवाडा मुक्त होऊन ७४ वर्षे झाली; पण मराठवाड्याचे दुखणे काही दूर झालेले नाही; संपूर्ण विकासाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे.

# बिल्डिंगच्या तिसऱ्या माळ्यावरून खाली पडल्याने इसम जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भानघर येथील साइटवर लिफ्टने वाळूवर नेण्याचे काम करत असताना बिल्डिंगच्या तिसऱ्या माळ्यावरून खाली पडल्याने ४५ वर्षे जखमी झाला आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चौघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेरे येथे राहणारा तुलसी लालू माहतो हा बिगारीचे काम करतो. भानघर येथील आयकॉन बिल्डरच्या साइटवर एका बिल्डिंगच्या तिसऱ्या माळ्यावर जाऊन लिफ्टने वाळू वर आणण्याचे काम करत होता. यावेळी लिफ्टने वाळू वर आणण्याचे काम करत असताना बिल्डिंगच्या बाहेर तात्पुरता तयार केलेल्या मयानची रस्सी व बांबू अचानक तुटला. व तुलसी हा तिसऱ्या माळ्यावरून खाली जमिनीवर पडला. त्यामुळे त्याची पाठ, कमरेस व दोन्ही पायास मार लागला. यावेळी कॉन्ट्रॅक्टर, ठेकेदार, बिल्डर यांनी सुरक्षिततेसाठी लागणारे हेल्मेट, बेल्ट व इतर वस्तू पुरवल्या नव्हत्या. त्याला एमजीएम रुग्णालय, कामोठे येथे आणण्यात आले. याप्रकरणी आयकॉन बिल्डर अँड डेव्हलपर्सचे मालक, कंत्राटदार हनुमान ढवळे, ठेकेदार नरसिंह तलवार, इंजिनिअर परवीन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहर पोलीस स्टेशन जागेचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा सुरु : पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नव्याने होत असलेला विमानतळ त्याचप्रमाणे पनवेल शहर पोलीस स्टेशनच्या जागेचा प्रश्न सोडवण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु असल्याची माहिती नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांनी पनवेल येथे आयोजित नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ २ मधील मुद्देमाल हस्तांतरण आणि आयएसओ मानांकन प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात दिली.

यावेळी प्रसारमाध्यांशी बोलताना पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांनी सांगितले कि, विमानतळासह पनवेलच्या शहर पोलीस स्टेशन जागेचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा सुरु असून यासंदर्भात सिडकोने नवीन विमानतळ परिसराचा आराखाडा प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये प्रस्तावित पोलीस ठाणे सुद्धा आहे. विमानतळ बनण्यास अजून अवकाश असल्याने त्या जागेसंदर्भात सुद्धा आम्ही शासनदरबारी पाठपुरावा करतो आहे.

नवी मुंबई मध्ये सिडकोने काही ठिकाणी पोलीस स्टेशन उभारणी साठी जागा दिल्या आहेत तरीपण अजून २ ते ३ पोलीस स्टेशनच्या जागेचा प्रश्न प्रलंबित आहे त्यासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

त्यामध्ये प्रामुख्याने पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या स्वतः च्या जागेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी आम्ही लक्ष घातले असल्याची माहिती पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांनी दिली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## यंदा शेल इंडियाच्या कामगारांना मिळणार तब्बल ९५ हजार रुपये बोनस

एक महिन्यावर आला आहे अशातच दिवाळी बोनस हा कामगारांचा नेहमीच जिव्हाळ्याचा प्रश्न राहिला आहे. त्या अनुषंगाने सदर संघटनेकडून कंपनी व्यवस्थापनाला बोनस मागणीचे पत्र देऊन चर्चा घडविण्यात आली आणि त्या अनुषंगाने व्यवस्थापनाने सकारात्मक निर्णय घेत कामगार आणि कंपनी हिताचा निर्णय घेतला. या करारामुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण असून त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर, कामगारनेते जितेंद्र घरत यांचे आभार व्यक्त केले.

सदर करारावर संघटनेच्यावतीने अध्यक्ष जितेंद्र घरत, व्यवस्थापनाच्या वतीने मार्केटिंग व्यवस्थापक गुलशन चौधरी, एच आर व्यवस्थापक शशांक शेखर, उत्पादन निर्मिती व्यवस्थापक सागर करुळकर, संघटनेच्या सचिव समीरा चव्हाण, कामगार प्रतिनिधी रामदास गोंधळी, सुनिल पाटील, जयराज जाधव, यासिन शेख, अनिल पावशे, सुनिल हरिचंद्र यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

## ठाकरे गट पुन्हा एकदा गाफिल राहिला ; दसरा मेळाव्याचे दुसरेही ग्राऊंड गेले

माहिती समोर आली आहे. बीकेसीमध्ये दोन मैदानं आहेत. यातील एमएमआरडीच्या मुख्य मैदानासाठी शिंदे गटाकडून अर्ज दाखल करण्यात आला होता. प्रथम अर्ज करणाऱ्यास प्राधान्य या नियमाअंतर्गत एमएमआरडीएकडून शिंदे गटाला दसरा मेळाव्यासाठी परवानगी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तर शिवसेनेकडून बीकेसीतील दुसऱ्या मैदानासाठी परवानगी मागण्यात आली होती. पण संबंधित मैदान आधीच एका कंपनीकडून कार्यक्रमासाठी आरक्षित केल्यानं ठाकरे गटाची परवानगी नाकारण्यात आली आहे.

बीकेसीतील मैदानासाठी प्रथम अर्ज करणाऱ्यास प्राधान्य हाच निकष जर लावण्यात आला असेल तर शीवतीर्थवर दसरा मेळावा घेण्यसाठी आम्हालाच परवानगी मिळायला हवी. कारण शिवसेनेनं पहिला अर्ज दाखल केला आहे, असा दावा शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी केला आहे. आमचा गट वगैरे काही नाही. आम्हीच खरी शिवसेना आहोत आणि एमएमआरडीएवर शिंदे गटाला परवानगी देण्यात आल्याचं मला कळालं. प्रथम येणाऱ्या प्राधान्य या निकषाअंतर्गत त्यांना परवानगी देण्यात आली असेल तर शीवतीर्थवर शिवसेनेलाच परवानगी मिळायला हवी. कारण आम्ही आधी अर्ज दाखल केला आहे. दसरा मेळावा ही एक परंपरा आहे. त्यामुळे मोर्चेबांधणीवगैरे करण्याची आम्हाला गरज नाही. परंपरेनुसार शीवतीर्थवरच शिवसेनेचा मेळावा होईल, असं अरविंद सावंत यांनी म्हटलं आहे.

## अडीच कोटींचा रक्तचंदन साठा जप्त

पाठविण्यात येणार होता. मात्र, डीआरआय अधिकाऱ्यांनी त्या आधीच कारवाई केली.

जेएनपीए बंदराला मागील अनेक वर्षांपासून आंतरराष्ट्रीय रक्तचंदन माफियांचा विळखा पडला आहे. त्यामुळे बंदरातून रक्तचंदन तस्करीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. काही प्रकरणात तस्करांच्या काही हस्तकांना पकडण्यातही यश आले आहे. मात्र, रक्तचंदन तस्करीच्या मुख्य सूत्रधारांना पकडण्यात अद्यापही डीआरआयच्या अधिकाऱ्यांना यश मिळाले नाही.

## माणगावमध्ये रुग्णांचे आरोग्य राम भरोसे

रुग्णालय माणगांव शहरात आहे. या ठिकाणी आजारपणात अपघातप्रसंगी तातडीच्या वेळी इमर्जन्सिला देखिल यातना सहन करणाऱ्या अनेक रुग्णांना आयतेवेळी दूसरी कडे न्यावे लागल्याने पेशंटच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केल्याच्या घटना घडत आहेत.

हे ही नसे इतुके; गरोदर मातांना देखिल हा अनुभव येत आहे. प्रसुतीच्या वेळी अनपेक्षित परिस्थितीत आयत्यावेळी इकडुन तिकडे नेण्यास सांगितले जाते. प्रसुती यातना सहन करीत हलवावे लागल्याने मोठा त्रास सहन करावा लागल्याचे त्यांच्या नातेवाईकांनीही हा दूर्धर अनुभव आल्याचे सांगितले जाते.

तज्ञ डॉक्टर व अद्ययावत यंत्रणा असुन काय फायदा ? ती रुग्णसेवे साठी उपयुक्त नसुन ही आरोग्य यंत्रणा राम भरोसे चालली आहे, असे उपहासाने म्हटले जात आहे. सर्व सक्षम अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व धन्वंतरी डॉक्टर्स देवांना माणगांवकरांचे साकडे आहे, रुग्ण सेवाही ईश्वर सेवा आहे. म्हणुनच आपली आमच्यावर कृपादृष्टी रहावी, यातुन मार्ग काढावा अशी याचना ते करीत आहेत.

# उरणमध्ये चोरीच्या घटनेत वाढ सायकल चोर सीसीटीव्ही कॅमेरात कैद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण न्यायालयाच्या जवळच राहत असलेल्या निष्कर्ष प्रमोद ठाकूर या तरुणांनी इमारतीच्या आवारात पार्किंग करुन ठेवलेली सायकल अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवत चोरण्याची घटना घडली आहे. सदर घटना ही शनिवारी (दि१७) घडली असून अज्ञात चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहेत. अशी माहिती तक्रारदार प्रमोद ठाकूर यांनी दिली आहे.

तक्रारदार प्रमोद ठाकूर यांनी माहिती देताना सांगितले की आम्ही कुटुंब उरण न्यायालयाच्या जवळच असणाऱ्या इमारतीत राहत आहोत. माझा मूलगा निष्कर्ष ठाकूर यांनी आपली सायकल इमारतीच्या आवारात नेहमी प्रमाणे शनिवारी ( दि१७) पार्किंग करुन ठेवलेली होती. रविवारी(दि१८) सकाळी उठल्यावर पार्किंग करुन ठेवलेली सायकल गायबच झाली असल्याचे दिसून आले. त्यानंतर शोधाशोध केली. आणि इमारतीच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता.तीन अज्ञात व्यक्ती इमारतीच्या आवारात वावरत असताना व सायकल चोरताना दिसून आले. यासंदर्भात उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.उरण पोलीसांनी सदर सायकल चोरांचा शोध घ्यावा अशी मागणी आम्हा कुटुंबांची आहे.




### जाहीर नोटीस

यशोमंगल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल (नोंदणी क्र.आर.जी.डी./पी.डब्ल्यू.एल./एच.एस.जी. (टिसी) ५३७१, सन १९९६/९७, दि.४/१०/१९९६), मालमत्ता क्र.०३२, ६३३, ६३३/१, एकूण क्षेत्र १७४९ चौ.मी. तर्फे सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी बांधकाम क्षेत्रातील (पुनर्विकास प्रकल्प व्यवस्थापक) प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्स्ट (PMC) म्हणून नेमणूक करावयाची आहे. हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या अनुभवी व कमीत कमी २५ (पंचवीस) वर्षे बांधकाम क्षेत्रातील प्रत्यक्ष तांत्रिक व याच क्षेत्रातील कमीत कमी कायदेशीर व व्यवस्थापकीय १० (दहा) वर्षे अनुभव असलेल्या कंन्सल्टंन्स्ट व्यक्ती / संस्था / कंपनी यांचेकडून देकार / निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी देकार स्वीकारण्याची अंतिम तारीख ही २५/०९/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० (P.M.) वाजेपर्यंत असेल, तसेच आ-लेले देकार / निविदा त्याच दिवशी सायंकाळी ५.०० (P.M.) वाजेपर्यंत सर्व उपस्थितांसमक्ष उघडण्यात येतील. या कामासाठी आलेले देकार स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे गृहनिर्माण संस्था स्वतःकडे राखून ठेवत आहे.

स्थळ : पनवेल
दिनांक : १९/०९/२०२२

**सही/-**
**सभापती / सचिव**
**यशोमंगल सहकारी गृनिर्माण संस्था मर्या.,**
**डॉ.आर.डी.पटवर्धन मार्ग, सिटी पोस्टाजवळ,**
**पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.क्र.९२२४१८१४१२/९२२००४०४०४**



मा.मुजावर साहेब कोर्ट
**ॲड.शुभांगी शेलार**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२२८/२०२१
नि.नं.१३/ड
ने.ता.०७/१०/२०२२

श्रीमती.मुमताज उस्मान शेख — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार हे मरहुम उस्मान अब्बास शेख यांचा कायदेशीर पत्नी व मुले आहेत. मरहुम उस्मान अब्बास शेख, यांचे निधन दि.०७/१०/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाले आहे. मरहूम उस्मान अब्बास शेख यांची खालील वर्णनाची मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णन

१) MH-01-Z-2677. चेसीस नं.DDFBEF05015, इंजिन नं. DDMBEF05077. बजाज मोटार सायकल.
२) MH-46-AM-5237. चेसीस नं.ME4JC589LET373311, इंजिन नं. JC58ET3559912. होंडा मोटार सायकल.

सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत मरहूम उसमान अब्बास शेख यांचे कायदेशीर वारसाचे सर्टीफिकेट देईल.

तारीख ३० माहे ०८ सन २०२२

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.एन.ए.शेख**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२३२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/१०/२०२२

१) श्रीमती.शरिफा सुलेमान शेख
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सुलेमान शेख, घर नं.१९२, इमाम हसैन चौक, घोडबंदर रोड, जामा मस्जीद जवळ, ठाणे, वेस्ट, ठाणे
२) श्रीमती.रिहाना महमद शेख
वय : ४८ वर्षे,धंदा : गृहिणी
रा.नयाद शेख हाऊस नं.७१, धानसर, पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र
३) श्री.सुलतान इस्माईल शेख
वय : ४६ वर्षे, धंदा : व्यापार
रा.नयाद शेख हाऊस नं.७१, धानसर, पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र
४) श्री.नयाद इस्माईल शेख
रा.नयाद शेख हाऊस नं.७१, धानसर, पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, पै.बेगम आदम तेली हे दि.१०/०१/२०१७ रोजी धानसर येथे मयत झाले आहेत. त्यांच्या खुद्द मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ८४ | १ | १-१२-६०<br>पो.०-०१-३०<br>एकूण ०-१३-९० | २.८२ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मयत पै.बगम आदम तेली यांच्या मालकीची होती व आहे. यांच्या मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता व ७/१२ सदरी अर्जदार यांच्या नावे दाखल करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारस दाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व उचित असल्याने अर्जदार यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील जमिनीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यांसह स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की, वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे. व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज दि.१५ माहे सप्टेंबर सन २०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.एन.ए.शेख**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३०४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/११/२०२२

१) श्रीमती.खतीजा शेखअली सांगले
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.नजमा रिजवान सांगले
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्रीमती.रुखसार रिजवान सांगले
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.अलीशहा रिजवान सांगले
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.१ ते ४ सर्व कायम रा.प्रभू वाडी मोहल्ला, चिंचघर, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी ४१५७०९
सध्या रा.२०५, राधे हेरिटेज, पळस्पे गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकंस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, पै.रिजवान शेखअली सांगले हे दि.०४/०५/२०२० रोजी कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. यांच्या खुद्द मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : तळोजा फेज-२, ता.पनवेल, जि.रायगड येथे नमूद केलेली सदनिका आहे. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजा फेज-२, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सदनिका नं. | बिल्डींग / इमारतीचे नाव | क्षेत्र | पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | सदनिका नं.९०८, नववा मजला | आस्था रिव्हर व्ह्यू | ४९.२५४ चौ.मी. कारपेट, एरिया | प्लॉट नं.३ आणि ४, सेक्टर १८, तळोजा फेज-२, ता.पनवेल, जि.रायगड |

वरील वर्णनाच्या सदनिका मयत पै.रिजवान शेखअली सांगले यांच्या मालकीची होती व आहे. यांच्या मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता तसेच सदरहू मिळकत अर्जदार यांच्या नावे दाखल करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारस दाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व उचित असल्याने अर्जदार यांनी मयताचा वारस दाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जातील जमिनीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यांसह स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास असे समजण्यात येईल की, वरील मिळकतीबाबत इतर कोणाचाही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे. व सदरहू अर्जदार ना.कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज दि.१४ माहे सप्टेंबर सन २०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बँक ऑफ महाराष्ट्राची फॉरेक्स सेवा पनवेलला सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बँकेच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून बँक ऑफ महाराष्ट्राने फॉरेक्स केंद्राचा शुभारंभ नुकताच पनवेलला केला. याप्रसंगी प्रमुख अतिथी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, बँकेच्या महाप्रबंधक व नवी मुंबई झोनच्या झोनल मॅनेजर अपर्णा जोगळेकर, उप झोनल मॅनेजर सौरभ सिंग, सहाय्यक महाप्रबंधक व शाखा प्रबंधक पिंकी राणी, उद्योजक मंगेश परुळेकर उपस्थित होते.

याप्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके म्हणाले की, बँकेच्या फॉरेक्स केंद्राला पनवेल व रायगड परिसरातील नागरिकांना ह्या सुविधेचा लाभ मिळेल व त्यांच्या व्यवसाय वाढीला चालना मिळेल. बँकेच्या ह्या स्तुत्य उपक्रमा बद्दल त्यांनी बँकेची प्रशंसा करून आभार मानले. ते पुढे म्हणाले की बँक ऑफ महाराष्ट्रने पनवेलच्या शिरपेचात एक मनाचा तुरा खोवला आहे. ही खरोखर सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. याप्रसंगी बँकेच्या महाप्रबंधक व झोनल मॅनेजर अपर्णा जोगळेकर म्हणाल्या की, फॉरेक्स केंद्राची मागणी ही पनवेल व रायगडवाशियांची बरेच दिवसांची होती व ती आज पूर्ण करण्यासाठी बँकेला अभिमान वाटत आहे. ह्या फॉरेक्स केंद्रामुळे ह्या परिसरातील व्यवसाय वाढीला चालना मिळेल. बँक नेहमीच ग्राहकाभिमुख योजना राबवून ग्राहकांच्या बँकिंग गरजा भागवीत असते अश्या त्या म्हणाल्या. त्यांनी ह्या फॉरेक्स केंद्राच्या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन याप्रसंगी केले. याप्रसंगी फॉरेक्सच्या विविध उत्पादनांची माहिती पॉवर पॉईंट द्वारे उपस्थित ग्राहकांना देण्यात आली व उपस्थितांच्या शंकांचे सुद्धा समाधान करण्यात आले.

# पाली खोपोली मार्गावर जंगली पिर नदीकाठचे संरक्षण कठडे तुटल्याने जिवघेण्या अपघाताचा धोका

## एम. एस. आर. डी. सी प्रशासनाच्या डोळ्यावर पट्टी, प्रशासनाला जीवघेण्या अपघाताची प्रतिक्षा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



सरकारी काम आणि बारा महिने थांब या म्हणीचा प्रत्येय पाली खोप-ोली मार्गावरील जंगली पीर आंबा नदीकाठावरील वर्षभरापासून तुटलेल्या संरक्षण कठडे पाहिल्यावर येतो. संरक्षण कठड्याअभावी वेगवान वाहने नदीत कोसळून मोठी जिवीतहाणी होण्याची भिती असताना एम.एस.आर.डी.सी प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून अपघाताच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसते.

पाली खोपोली राज्य महामार्गाच्या वहातुक सुरक्षेसह प्रशासनाने येथील तुटलेले कठडे तातडीने बसवावेत अन्यथा तिव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत चव्हाण यांनी दिला आहे. अनेक ठिकाणी धोकादायक वळणे व अपघाती क्षेत्र असूनही कोणतेही सूचना फलक याठिकाणी नाहीत, संरक्षण कठड्याच्या गंभीर समस्येकडे सातत्याने वृत्तपत्रातून आवाज उठवूनही गेंड्याची कातडी पांघरलेल्या प्रशासनाला जाग येत नसल्याचे पाहून प्रवाशी जनतेतून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. वहातुक व प्रवासाच्या दृष्टीने जंगली पिरनजीक नदीकाठी संरक्षण कठडे असणे अत्यंत गरजेचे आहे. अरुंद व वळणाच्या रस्त्यावर नदीच्या बाजूने वेगवान वाहने जात येत असतात. यापुर्वी याठिकाणी अपघ-ाती घटना घडल्या आहेत. अशातच वहानचालकाचा वहानावरुन ताबा सुटल्यास संरक्षण कठडे नसल्याने वहान खोल नदीत कोसळून मोठी जिवीतहाणी होण्याची शक्यता आहे.

आंबेनळी घाटात झालेल्या अपघाताची पार्श्वभुमी पाहता संरक्षण कठड्याचे महत्व प्रशासनाने जाणणे गरजेचे आहे.

मात्र तसे होताना दिसत नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतर घोडे नाचविण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये याकरीता योग्य ती उपाययोजना करुन आधिच खबरदारी घेणे अधिक उपयुक्त ठरते. जंगली पीर नदीकाठचे संरक्षण कठडे एम.एस.आर.डी.सी प्रशासनाने तत्काळ बसवावेत अन्यथा भविष्यात होणार्या जिवघेण्या अपघातास प्रशास-नाला जबाबदार धरले जाईल असा इशारा लताताई कळंबे यांनी दिला आहे.

## ७५ हजार रुपयांच्या जनरेटरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जुना ठाणा नाका, पनवेल येथे शॉपच्या बाहेर साखळीने बांधून ठेवलेला ७५ हजार रुपये किमतीचा जनरेटर चोरट्यांनी चोरून नेला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पो-लीस अधिक तपास करत आहेत.

धीरूभाई एंटरप्राइजेसचे धीरूभाई लिंबानी यांचे जुना ठाणा नाका, पनवेल येथे झेरॉक्स सेंटर आहे. त्यांनी जनरेटर दुकानाच्या शटर शेजारी साखळीने बांधून ठेवला होता. १६ सप्टेंबर रोजी त्यांना दुकानाबाहेर ठेवलेल्या जनरेटर दिसून आला नाही. त्याचा सर्वत्र शोध घेतला असता तो सापडून आला नाही. त्यामुळे अज्ञातांनी जनरेटर चोरून नेला असल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली.

## सुकेळी खिंडीत कंटेनर उलटल्याने चालक जखमी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई -गोवा महामार्गावर अपघातांची मालिका सुरू असतांनाच महामार्गावरील अपघातांसाठी धोकादायक खिंड अशी ओळख असलेल्या सुकेळी खिंडीमध्ये कंटेनर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे कंटेनर रस्त्याच्या खालच्या बाजूला जाऊन उलटला. हा अपघात रविवारी (दि.१८) रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडला. यासंदर्भात महामार्ग पोलिस मदत केंद्र, वाकण यांच्याकडुन मिळालेल्या माहितीनुसार मुंबई -गोवा महामार्गावरील सुकेळी खिंडीच्या नागोठणे बाजूकडील उतारावर महाड बाजुकडुन मुंबईच्या दिशेने जाणारा कंटेनरच्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे गाडी रस्त्याच्या उजव्या बाजूला गेली. त्यामुळे कंटेनरवर असलेली रिकाम्या टाकीसहीत कंटेनर पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात कंटेनर चालक रामजी रामधर तिवारी (वय- ५०) रा.उत्तरप्रदेश हा किरकोळ जखमी झाला असुन त्यास महामार्ग पोलिसांनी नागोठण्यातील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

दरम्यान या अपघाताची माहिती मिळताच वाकण येथील महामार्ग पोलिस मदत केंद्रातील कर्तव्यदक्ष पोलिस उपनिरीक्षक महादेव मोकल यांनी आपल्या कर्मचा-यांसह घटनास्थळी धाव होऊन वाहतूक सुरळीतरित्या चालू करण्यासाठी सहकार्य केले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.राजकुमार रामशरण खन्ना आणि सौ.सिमा राजकुमार खन्ना यांच्या नावे असलेले सिमरन रेसिडेन्सी को.ऑप. हौ.सो.लि., फ्लॅट नं.१०४, पहिला मजला, ए विंग, प्लॉट नं.२१, सेक्टर ७, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र. क्षेत्रफळ ६५० स्क्वे.फिट बिल्टअप यांच्याकडून खारघर परिसरात वरील मिळकतीचे खरेदीखत त्याचे दस्त क्र.PVL-1-8934-2009 दि.१४/१२/२००९ हे गहाळ झाले आहे. त्याबाबत खारघर पोलीस ठाण्यामध्ये दि.०५/०८/२०२२ रोजी मिसींग रजिस्टर नं.१७७६/२०२२ अन्वये कायदेशीर नोंद केलेली आहे.

श्री.राजकुमार रामशरण खन्ना आणि सौ.सीमा राजकुमार खन्ना यांनी वरील मिळकत ही नोंदणीकृत दस्ताद्वारे श्री.रमेशचंद्र जोशी आणि सौ.मनोरमा जोशी यांना रजिस्टर दस्त क्र. PVL-3-4945-2022 दि.२३/०३/२०२२ च्या अन्वये विक्री केलेली आहे. या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मिळकतीचे दस्ताऐवज कोणाला सापडल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे दस्ताऐवज कोणाला सापडल्यास खाली सही केलेल्या पत्यावर आणून द्यावेत. त्यास योग्य तो मोबदला देण्यात येईल. ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसानंतर आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

दि.१९/०९/२०२२

सही/-
**ॲड.पुनम ए. खरे**
**३, सत्यकृपा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.१०३, सेक्टर-९, न्यू पनवेल (पु),**
**पिनकोड-४१०२०६**
**फोन नं.२७४६४५४८,**
**मो.९८२०४०८४७२**

मा.मुजावर साहेब कोर्ट
**प्रो.जमा रु.१००/-** **वकील श्री.योगेश ग. पेडणेकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.१३५३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/१०/२०२२

१) श्रीमती.संध्या गणेश केदारी
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : १५५, खालची आळी, पोस्ट-पारगाव,
उरण पनवेल रोड, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
२) सौ.स्वाती रुपेश धुमाळ
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : मु.पोस्ट-कोपर, ता.पनवेल,
जि.रायगड ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा कै.गणेश जनार्दन केदारी हे दि.०८/०३/२०२२ रोजी सुखम हॉस्पिटल, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मरण पावले. त्यांचा मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार १) श्रीमती.संध्या गणेश केदारी ही विधवा पत्नी तसेच रा.१५५, खालची आळी, पोस्ट-पारगाव, २) सौ.स्वाती रुपेश धुमाळ ही विवाहित मुलगी मु.पोस्ट-कोपर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर | ३ | १२८ | २९०.०० |

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळवण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणतेही हक्क हितसंबंध, अधिकार अशी कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांची तशी लेखी हरकत हा जाहीरनामा जाहीर झाल्यापसून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दखविल्यास सदरहू मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९/०९/२०२२

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** **कोर्टाचा शिक्का** **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## संजय गांधी योजना समितीच्या बैठकित ८२ प्रकरणे मंजूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संजय गांधी योजना समितीची बैठक विजय तळेकर, तहसीलदार पनवेल यांचे अध्यक्षतेखाली तहसील कार्यालय पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी संजय गांधी योजना समितीच्या बैठकित ८२ प्रकरणे मंजूर करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये विनोद लचके-नायब तहसीलदार, (संजय गांधी योजना शाखा), संतोष पाटील, (अ.का.), अर्चना घरत, (अ.का.), गौतम कांबळे, महसूल सहाय्यक, सुवर्णा कोळी, तांत्रिक सहाय्यक व भरत काथारा यांच्या उपस्थितीत विशेष सहाय्य योजनेंतर्गत राज्य शासन पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, केंद्र शासन पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना तसेच राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजना इ. योजनांच्या लाभार्थ्यांच्या प्रकरणांना मंजुरी देण्यात आलेली आहे. संजय गांधी निराधार अन-ुदान योजनेची ७१ प्रकरणे मंजूर करण्यात आली. श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेची ४ प्रकरणे मंजूर करण्यात आली. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेची १ प्रकरणे मंजूर करण्यात आली. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेची २ प्रकरणे मंजूर करण्यात आली. राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजनेची ४ प्रकरणे मंजूर करण्यात आली.

वरीलप्रमाणे संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनांच्या प्रकरणात दर प्रति महिना रक्कम रु. १ हजार ते १ हजार २०० मिळून एकूण रक्कम रु. ८१ हजार ५०० इतके अनुदान तसेच कुटूंब अर्थसहाय्य लाभार्थ्यांना प्रत्येकी एक रकमी २० हजार प्रमाणे ८० हजार असे एकूण १ लाख ६१ हजार ५०० एवढे अनुदान वाटप करणेसाठी बैठकीत मंजूरी देण्यात आली आहे. तसेच पनवेल तालुक्यात दरमहा विशेष सहाय्य योजनेंतर्गत एकूण ५ हजार १३१ लाभार्थ्यांना रक्कम रूपये ४४ लाख १९ हजार ६०० एवढे अनुदान वाटप करण्यात येते.

मा.सोनावणे साहेब
**प्रो.जमा रु.५०/-** **अर्जदारतर्फे वकील**
**वारस दाखला** **ॲड.कैलास घरत**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१३०७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/११/२०२२

१) इस्माईल मोहम्मद मोमीन
वय : ६८ वर्षे, धंदा : काही नाही
रा.दाऊद फजल बिल्डींग, रुम नं.४४/४५,
तिसरा मजला, ११४, भंडारी रोड, क्रॉफोड मार्केट,
मोहम्मद अली रोड, मुंबई ४००००३
२) अब्दुल कादिर मोहम्मद मोमीन
वय : ६२ वर्षे, धंदा : काही नाही
रा.मोहम्मद इब्राहीम मोमिन १८२/१८४, तिसरा फ्लोर
डाइमंड अपा.नागदेवी स्ट्रीट, मोहम्मद अली रोड,
क्रावफोर्ड मार्केट, मुंबई, मुंबई-४००००३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ व २ यांची आई चाँदबी हाजीमहमंद मोमीन उर्फ चाँदबी महमंद मोमीन (मयत) यांचा मृत्यू दि.१७/०६/२००४ रोजी मुन्सिपल कॉर्पोरेशन, मुंबई येथे झालेला आहे. सबब चाँदबी हाजीमहमंद मोमीन उर्फ चाँदबी महमंद मोमीन (मयत) यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ व २ हेच वारसदार आहेत.

चाँदबी हाजीमहमंद मोमीन उर्फ चाँदबी महमंद मोमीन (मयत) ह्या हयात असताना त्यांच्या ताबेकब्जात वहिवाटीत कसवणुकीत आणि मालकी हक्कात असलेली खालील वर्णनाची वाणिज्य / गाळा मिळकत आहे. वाणिज्य / गाळा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे....

**वाणिज्य/गाळा मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| बिल्डींगचे नाव | विभागाचे नांव | पनवेल सिटी सर्व्हे नं. | मजला | शॉप नं. | क्षेत्र चौ.फूट |
|---|---|---|---|---|---|
| पटेल चेंबर्स | एम.ई.सी.बी. ऑफिस समोर | १२४४/२ (पी) फायनल प्लॉट नं.२६०/१ क्षेत्र ५२० चौ.मी. | तळ मजला | ०१ | १२० चौ.फूट बिल्टअप |

वरील मिळकती व मिळकतीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या संदर्भात व इतर फायदे याकरिता अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१९/०९/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** **कोर्टाचा शिक्का** **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे साो
**ॲड.उज्वला शिंदे / साळुंखे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर साो पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.८६१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/११/२०२२

१) श्रीमती.सुनंदा विष्णू उतेकर
वय : ६५ वर्षे, धर्म : हिंदू
२) श्री.नरेंद्र विष्णू उतेकर
वय : ४३ वर्षे, धर्म : हिंदू
३) श्री.राकेश विष्णू उतेकर
वय : ४१ वर्षे, धर्म : हिंदू
अ.नं.१ ते ३ रा.ए-३०३, हारपेस ॲव्हेन्यू,
प्लॉट नं.१०३, १०४, १०७, १०८, से.४,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) पुनम विष्णू उतेकर उर्फ सौ.साई अरविंद कदम
वय : ३९ वर्षे, धर्म : हिंदू
रा.४०२/बी मानवस्टल २, सी एच एस,
एल टी डी, साई रोड, नियर डीबी वुडस टॉवर
गोकुळधाम, मुंबई, मुंबई ४०००६३ सर्व अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

कै.विष्णू बाबू उतेकर यांच्या नावे असलेल्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे

**१) अपार्टमेंट नं.पी.एल.५, ९/९, दुसरा मजला, सिडको कॉलनी, प्लॉट नं.१७/५, सेक्टर-१७, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र २४.७४ स्क्वे.मीटर**

वरील अर्जदार क्र.१ श्रीती.सुनंदा विष्णू उतेकर ही विष्णू बाबु उतेकर यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ श्री.नरेंद्र विष्णू उतेकर हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.३ श्री.राकेश विष्णू उतेकर हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.४ पुनम विष्णू उतेकर उर्फ सौ. साई अरविंद कदम ही विवाहित मुलगी आहे.

कै.विष्णू बाबु उतेकर यांचे निधन दि.२५/०१/२०२२ रोजी नवीन पनवेल येथे झाले आहे. कै.विष्णू बाबू उतेकर यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड येथे रेकॉर्ड सदरी केलेली आहे व पनवेल महानगरपालिका, ता.पनवेल, जि.रायगड यांनी त्याप्रमाणे मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९/०९/२०२२ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** **कोर्टाचा शिक्का** **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जुन्या भांडण्याच्या रागातून दोघा जणांनी केली एकास जबरी मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जुन्या भांडण्याचा राग मनात धरून दोघा जणांनी मिळून एकास जबरी मारहाण केल्याची घटना पनवेल जवळील करंजाडे सेक्टर २ येथे घडली आहे. करण राठोड असे या तरुणाचे नाव असून त्याला दोघा जणांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून लोखंडी रॉड व हातातील कड्याच्या साहाय्याने त्याच्या डोक्यावर, पाठीवर, मानेच्या डाव्या बाजूस जबरी मारहाण करून त्याला जखमी केल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**अर्जदारांकरिता ॲडव्होकेट. ॲड.उदय प्र. मोकल**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२२८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/११/२०२२

(कै.संजय बाबुलाल नावरकर यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.संकेत संजय नावरकर (मुलगा)
वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण
२) श्रीमती.रेखा संजय नावरकर (पत्नी)
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
३) कुमारी.धनश्री संजय नावरकर (मुलगी)
वय : २७ वर्ष, धंदा : नोकरी
अर्जदार १ ते ३ रा.फ्लॅट नं.१०२, शिवाली अपार्टमेंट
प्लॉट नं.२०९, सेक्टर नं.१०, नवीन पनवेल,
रायगड, पिन कोड-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.संजय बाबुलाल नावरकर यांचे निधन दि.२४/०९/२०२१ रोजी डॉ.डी.वाय. पाटील हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे झालेले आहे. कै.संजय बाबुलाल नावरकर यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. संजय बाबुलाल नावरकर कायदेशीर वारस आहेत.

अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.संजय बाबुलाल नावरकर यांनी मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**१) मौजे : नवीन पनवेल (पुर्व), ता.पनवेल,**
**जि.रायगड येथील निवासी सदनिका**
**मौजे : नवीन पनवेल (पूर्व), शिवालीक अपार्टमेंट,**
**फ्लॅट नं.१०२, पहिला मजला, सेक्टर १०,**
**प्लॉट नं.२०९, सेक्टर नं.१०,**
**क्षेत्रफळ : ३४.५४ चौरस मीटर**

तसेच कै.संजय बाबुलाल नावरकर यांनी मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**२) मौजे : नवीन पनवेल (पुर्व), ता.पनवेल,**
**जि.रायगड, येथील निवासी सदनिका**
**बिल्डींगचे नाव : चंद्रिका, फ्लॅट नं.(रो हाऊस) नं.९,**
**तळमजला, प्लॉट नं.९ अे, सेक्टर-३,**
**क्षेत्रफळ : ७०५.०० चौरस फूट**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.संजय बाबुलाल नावरकर यांचे शिवाय अन्य कुणचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१६/०९/२०२२

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** **कोर्टाचा शिक्का** **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## उशिरा कामावर आल्याने मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामावर उशिरा का आला व स्नेहल या मुलीला गाडीवर का आणले ह्या गोष्टीचा राग आल्याने सुपरवायझरने २१ वर्षे तरुणाच्या नाकावर मारहाण करून त्याचा नाक फ्रॅक्चर केला आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितळस येथील तुषार अशोक भोपी हा महावीर एक्झॉस्टिक बिल्डिंग न्यू कन्स्ट्रक्शन रोहिंजण येथे काम करतो. यावेळी तुषार याला पाच मिनिटे कामावर पोहोचण्यास विलंब झाला. तुषार बांबू शेडमध्ये टेबल खुर्चीवर बसला असताना सुपरवायझर सुरज पुजारी याने त्याला शिव्या दिल्या. व मोटरसायकल वरून स्नेहलला घेऊन का आला व कामावर उशिरा का येतो असे दम देऊन बोलू लागला. त्यानंतर त्याने तुषार याच्या नाकावर जोरदार प्रहार करून मान व डोके धरून तोंड टेबलावर आपटले. यावेळी तुषारच्या नाकाचे हाड तुटले. तुषार याच्यावर सत्यम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कळंबोली येथे उपचार सुरू आहेत.

## महिलांकडून प्लास्टिक कचरा, बाटल्या जमा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर डोंगराच्या पायथ्याशी पर्यटकांकडून टाकण्यात आलेल्या प्लास्टिक पिशव्या आणि बॉटल खारघरमधील महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी गोळा करून पालिकेच्या स्वाधीन केले. संततधार पावसामुळे खारघरमधील गोल्फ कोर्सलगत छोट्या-मोठ्या धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येत आहेत. धबधब्याचा आनंद घेतल्यानंतर खाद्यपदार्थ, पाण्याची आणि दारूच्या बाटल्या उघड्यावर ठेवून पसार होतात. यासाठी बिंदूसरी जैस्वाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या जमा करून पालिकेच्या स्वाधीन केल्या.


सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम
दैनिक रायगड नगरी
9619979706 / 9619737911



**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत सुरक्षित पोहोचण्यासाठी पोलादपूर शहरात आज आंदोलनाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर शहरामध्ये अंडरपास रस्ता गेल्यानंतर शहराच्या पुर्वेला आणि पश्चिमेला असलेल्या शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पायी चालत जाताना धोका निर्माण झाला असून यासंदर्भात गणेशोत्सव काळामध्ये पोलादपूर तहसिलदार दिप्ती देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाच्या अभियंत्या आकांक्षा मेश्राम आणि म्हाडकर यांच्या उपस्थितीत बैठक झाल्यानंतर आज साक्षात शिवछत्रपतींच्या पुतळ्याला घालणार साकडे घालून शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

गणेशोत्सव काळात पोलादपूर तहसिलदार दिप्ती देसाई यांच्या दालनामध्ये रयत शिक्षण संस्थेचे स्कूल कमिटीचे चेअरमन निवास शेठ, प्रिती बुटाला, राजन पाटणकर, दत्तोपंत साळुंखे सर तसेच अन्य नागरिकांनी विद्यार्थ्यांना पुर्वेकडील आणि पश्चिमेकडील शाळांकडे जाण्याकरीता निर्माण झालेल्या धोक्याची माहिती प्रशासनाला दिली.

पोलादपूर शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीकाळभैरवनाथ मंदिरालगतच्या शैक्षणिक संकुलाकडे पायी चालत जाणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना पोलादपूर एस.टी.स्थानक परिसरातील अंडरपासवरील ब्रिज वरून जाण्याची अपरिहार्यता निर्माण झाली आहे. मात्र, हे विद्यार्थी व विद्यार्थिनी अंडरपासवरील ब्रिजवरून पुर्वेकडील सर्व्हिसरोडचा वापर करून पायी चालत गेल्यास आणखी एका पादचारी पुलाची श्रीकाळभैरवनाथ मंदिरासमोरील राष्ट्रीय महामार्गावर आवश्यकता राहणार नाही. पुर्वेकडील रायगड जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ प्राथमिक शाळा व मुलींच्या शाळेसह शिवाजीनगर येथील जनसेवा प्रतिष्ठानची शाळा तसेच प्रभातनगर पूर्व येथील यशवंत इंग्लिश मिडीयम स्कूल या प्रशालेतील विद्यार्थ्यांना पुर्वेकडून सुरक्षित रस्त्यांवरून पायी चालत येण्याऐवजी असुरक्षित पध्दतीने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरून ये-जा करण्याची अपरिहार्यता निर्माण केली जात आहे. पोलादपूर शहरातील शंकरराव महाडीक इंग्लिश मिडीयम स्कूल हे गोकुळनगर परिसरात असल्याने याठिकाणी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट अंडरपासवरील पुलांचा वापर करणे सहजशक्य आहे, त्यामुळे या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांचे पालक आजच्या आंदोलनाला प्रतिसाद देतील, असे चित्र दिसत नाही.

पोलादपूर एस.टी.स्थानकापरिसरातील चार ब्रिजेसचा वापर करून शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना पुर्वेकडील आणि पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवरून घर आणि शाळेपर्यंत ये-जा करणे शक्य असूनही गेल्या काही महिन्यांपासून काही व्यक्ती व संस्थांसह राजकीय पक्षांकडून प्रभातनगर पूर्व आणि प्रभातनगर पश्चिम या लोकवस्त्यांना जोडणारा पादचारी पूल उभारण्याची मागणी जोर धरत आहे. आज होणाऱ्या शांतता रॅली आणि शिवछत्रपतींच्या पुतळ्यासमोर साकडे घालण्याच्या आंदोलनप्रसंगी कोणताही राजकीय पक्ष व संघटना सहभागी होणार नसून 'मी पालक' या संबोधनाखाली एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आल्याची माहिती प्राप्त होत आहे. या आंदोलनाचे आयोजक कोण हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी आधीच्या आंदोलनांशी संबंधित लोकच यात पुढाकार घेत असल्याचे सोशलमिडीयावरून फिरणाऱ्या पोस्टमुळे पोलादपूरकरांना समजून आले आहे. गणेशोत्सवापूर्वी पोलादपूर शहराच्या मुंबई बाजूच्या सर्व्हिसरोडलगत राष्ट्रीय महामार्गावर शिवशाही बस आणि एर्टिगा कारची समोरासमोर धडक झाल्यानंतर या बाजूने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग पायी चालत ओलांडणे धोकादायक असल्याने या आंदोलनाच्या यशाकडे पोलादपूरकरांचे लक्ष लागणार आहे.

# भरडखोल युवकांचा भाजपात प्रवेश

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथे भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग व श्रीवर्धन तालुकाध्यक्ष प्रशांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भव्य दिव्य असा दिमाखदार प्रवेश सोहळा पार पडला.

ॲड.जयदिप तांबुटकर व युवा वॉरिअर्स जिल्हा संयोजक संकेत नाकरेकर यांच्या विशेष प्रयत्नाने भरडखोल गावातील फुलपाखरू ग्रुपने जाहिरपणे पक्षप्रवेश केला. यावेळी भरडखोल सरपंच दिनेश चोगले, वेळास सरपंच आशुतोष पाटील, उपसरपंच किशोर भोईनकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रणय पेडणेकर, बागमांडला दांडा सरपंच तुषार विचारे, शहर कोअर कमिटी अध्यक्ष आदेश पाटील, विद्यार्थी आघाडी जिल्हा संपर्क प्रमुख वैभव कुलकर्णी, युवा मोर्चा शहराध्यक्ष प्रणिल बोरकर आदी तालुक्यातील भाजप पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व भरडखोल गावातील युवा वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

पक्षप्रवेश कार्यक्रम प्रसंगी अनिकेत भोईनकर याची युवा मोर्चा तालुका सरचिटणीस पदी नेमणूक करण्यात आली. यावेळी भाजपच्या पक्ष नेतृत्व वर विश्वास ठेऊन शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. एकूणच श्रीवर्धन तालुक्यातील हे पक्ष प्रवेश येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत बदल घडवणार असल्याचे चित्र दिसते.



# विभागीय माहिती कार्यालयाच्यावतीने सेवा पंधरवडा सेल्फी पॉईंटचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाने घोषीत केलेल्या राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवाडा (१७ सप्टें. ते २ ऑक्टोबर २०२२ ) निमित्त कोंकण भवन मध्ये उभारण्यात आलेल्या 'सेल्फी पॉईंट' चे आज उपायुक्त (सामान्य) श्री. मनोज रानडे, उपायुक्त (विकास) श्री. गिरिष भालेराव, सेवा व कर सहआयुक्त अपिल श्री. रमेश जैद यांनी स्वत:चा सेल्फी काढून उद्घाटन केले.




यावेळी विभागीय सहाय्यक भाषा संचालक योगेश ल. शेट्ये, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे तसेच कोकण भवनातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. अनेकांनी थांबून सेल्फी घेतले.

सामान्य नागरिकांच्या तक्रारी, अर्ज आणि प्रलंबित कामांवर कालमार्यादेत निपटारा व्हावा, यासाठी राज्यात दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या पंधरवड्यात नागरिकांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी संपूर्ण प्रयत्न करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे व मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

कोकण भवनात विविध विभागांची प्रशासकीय व विभागीय कार्यालये आहेत. या कार्यालयांमध्ये दररोज हजारो नागरिक विविध कामांसाठी भेटी देत असतात. दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा या विशेष सेवेची जनसामान्यांमध्ये जनजागृती व्हावी, शासनाच्या या सेवेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. या हेतूने उपसंचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे यांच्या संकल्पनेतून कोकण विभागीय माहिती कार्यालयामार्फत 'सेल्फी पॉईंट' उभारण्यात आला आहे.

# कळंबोलीच्या समस्या विरोधात निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय समाजपक्ष कळंबोलीच्या वतीने सिडको कार्यालय कळंबोलीचे कार्यकारी अभियंता बनगर यांना कळंबोलीच्या भेडसावत असणाऱ्या विविध समस्याविरोधात निवेदन देण्यात आले.



कळंबोली शहरामध्ये रस्त्याची झालेली अवस्था, रोड लाइट, सिडकोच्या मालकीच्या प्लॉटमध्ये वाढलेले गवत, रस्त्यावरील सांड़पाणी, स्केटर १२, १३, १४, १५ मध्ये सिडकोने जे खुले प्लॉट होते तिथे कुंपण केल्यामुळे वाहन धारक रस्त्यावर वाहन लावतात. सामान्य जनमाणसाना रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे. तसेच एखादी घटना घडून आग लागली किंवा काही झाले तर रुग्णवाहिका किंवा अग्निशमनची गाड़ी सुद्धा पास होऊ शकत नाही. या करीता सिडकोला निवेदन देण्यात आले. यावेळी इंजीनियर यांना चौकशी करीता पाठवितो आणि काम करून देतो, असे आश्वासन त्यानी दिले आहे. जर ही कामे ७ दिवसात पूर्ण झाली नाही तर राष्ट्रीय समाज पक्ष कळंबोलीच्या वतीने पवन काळे आणि अण्णा वावरे कळंबोलीत सिडको विरूद्ध आंदोलन करतील असा ईशारा देखील देण्यात आला आहे.

### आ.प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम ; विविध ठिकाणी शिबिर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सर्वत्र समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा होत आहे. वाढदिवसानिमित्ताने भाजपच्या वतीने विविध सेवाकार्य असलेल्या सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत पनवेल परिसरातील खांदा कॉलनी, खारघर आणि कामोठ्यात रविवारी (दि. १८) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. भाजप युवा मोर्चा तसेच वैद्यकीय आघाडी पनवेलच्या वतीने खांदा कॉलनी सेक्टर १ येथे झालेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.



या शिबिरास भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, रामनाथ पाटील, भीमराव पोवार, शशिकांत शेळके, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस चिन्मय समेळ, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, वैद्यकीय आघाडीचे जिल्हा सहसंयोजक डॉ. कृष्णा देसाई, तालुकाध्यक्ष डॉ. संतोष आगलावे,खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, महिला मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे, आशा मुंढे, आरती तायडे, अक्षय सिंग, विश्वजित पाटील, गौरव कांडपिळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रक्तदाते उपस्थित होते. खारघर तळोजा मंडल भाजप युवा मोर्चाच्या वतीने खारघर सेक्टर १९मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये गरीब आणि गरजू कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. श्री साई ब्लड बँक पनवेलच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात अनेक युवकांनी तसेच विविध समाजाच्या व्यक्तींनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

या शिबिराला भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगर-सेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील, रामजी बेरा, शत्रुघ्न काकडे, निलेश बाविस्कर, ॲड. नरेश ठाकूर, प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, बीना गोगरी, रमेश खडकर, वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, अल्पसंख्याक सेल प्रदेश सचिव मन्सूर पटेल, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत, गीता चौधरी, शुभ पाटील, अक्षय पाटील अंबालाल पटेल, सचिन वासकर, प्रभाकर जोशी, ॲड. इर्शाद पटेल, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, नवनीत मारू, फुलाजी ठाकूर, किरण पाटील, म्हात्रे, कुणाल संघानी, नंदकुमार मोरे, प्रमोद पाटील, पप्पू खामकर, सुमीत सहाय, जयश्री सूर्यवंशी, सुशीला शर्मा, निर्मला यादव, दिनेश रणशेवडे, सुजित पांडे आदी उपस्थित होते. कामोठ्यातील स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे निर्धार सामाजिक संस्था व झेंडा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, जय पावणेकर, अशोक पावणेकर, निलेश आहेर, विशाल बेलकर, अजित पवार, किरण भोसले आदी उपस्थित होते.

# २००५ पासूनच्या सरकारी कर्मचाऱ्यांना सुद्धा निवृत्ती वेतन लागू करा : एन. डी. मारणे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'संघटनेच्या माध्यमातून निवृत्ती वेतन धारकांना वेतन आयोग मिळण्यासाठी आपली संघटना नेहमीच प्रयत्नशील असते व यशस्वी देखील होते.

सरकारने २००५ पासून नोकरीत भरती झालेल्या नोकरदारांचे निवृत्ती वेतन बंद केले आहे. ते त्यांना लागू करावे कारण ३० - ३५ वर्षे हे नोकरदार काम करतात. त्यांना निवृत्ती नंतर वेतनाची आवश्यकता असते. सर्व तालुका व जिल्हा संघटनांनी राज्य संघटनेला आर्थिक मदत करावी. ' असे आवाहन महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष एन. डी. मारणे यांनी येथे केले.



रायगड जिल्हा सेवानिवृत्त संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा कर्जत मधील रॉयल गार्डनच्या सभागृहात आयोजित केली होती. जिल्हाध्यक्ष धुरंधर मढवी यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी राज्याचे कार्याध्यक्ष वसंत वाबळे, सचिव लक्ष्मण टेंभे, संजय राऊत, रोहिणी क्षीरसागर, कर्जत तालुकाध्यक्ष रामचंद्र भवारे, सूर्यकांत चंचे आदी उपस्थित होते. तालुका उपाध्यक्ष ग. सि. म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. भवारे यांनी प्रास्ताविकात सभेच्या आयोजनाबाबतची माहिती विषद केली.

सुरवातीला संजय देशमुख यांनी इशस्तवन, स्वागत गीत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील गीत सादर करून वातावरण निर्मिती केली. अहवाल वाचन एम. पी. वालेकर यांनी केले. त्यानंतर अनेक ठराव मांडण्यात आले. ते एकमताने मंजूर करण्यात आले. लक्ष्मण टेंभे यांनी 'हल्ली मोबाईलचा वापर सर्रास सुरू आहे.

आपण सुद्धा त्याचा वापर करून दररोज संपर्कात राहिले पाहिजे.' असे सूचित केले. धुरंधर मढवी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्यामला कदम यांनी तर आभार प्रदर्शन रमेश खैरे यांनी केले.

याप्रसंगी अरुण मोकल, वासुदेव इंगळे, आत्माराम देशमुख, आनंद जोशी, चंद्रकांत केळसकर, दिलीप पडवळ, अनंत खडे, मारुती बागडे, शीला घरत, संगीता मुरकुटे, जयराम पवाळी आदींसह जिल्ह्यातील निवृत्ती वेतन धारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नुकसान भरपाईसाठी डॉ.मनिष पाटील यांचे उरण तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण

**दै.रायगड नगरी । उरण**

दिघोडे ता. उरण, जि. रायगड येथे हेटवणे ते नवी मुंबई या मार्गावरील सिडको प्रशासनाची जलवाहिनी फुटल्यामुळे त्यामधुन वेगाने येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात दिघोडे गावातील पाईप लाईनच्या लगत असलेल्या अनेक घरांमध्ये पाणी घुसून नागरिकांच्या घरांचे व त्यामधील साहित्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याबाबतचे पंचनामे तलाठी वेश्वी, ग्रामसेवक दिघोडे, सरपंच दिघोडे यांनी केले होते.



सदर दिघोडे गावातील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात येईल असे आश्वासन सिडको प्रशासनाकडून ग्रामस्थांना देण्यात आले होते.मात्र दिड वर्षे उलटूनही नुकसानग्रस्तांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही.याबाबत सिडको प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही आज दीड वर्षाहून अधिक काळ होऊन सुद्धा सिडको प्रशासन नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत आहे.नुकसानग्रस्त व्यक्तींची कोणीच दखल घेत नसल्याने दिघोडे येथील एकूण १८ नुकसानग्रस्त ग्रामस्थांना आर्थिक नुकसान भरपाई मिळावी या प्रमुख मागणीसाठी उरण तालुका काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनिष अनंत पाटील यांनी उरण तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

दिनांक १९/०९/२०२२ रोजी आंदोलनाचा पहिला दिवस आहे.यावेळी रायगड जिल्हा जेष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, उपाध्यक्ष किरीट पाटील,रायगड जिल्हा काँग्रेस सरचिटणीस रामनाथ पंडित,शहराध्यक्ष प्रकाश पाटील, तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, महिला तालुकाध्यक्ष रेखा घरत, महिला तालुका उपाध्यक्ष निर्मला पाटील,मच्छीमार नेते मार्तंड नाखवा,माजी नगरसेवक बबन कांबळे, विभाग प्रमुख विनोद पाटील, श्रेयश घरत, विवेक म्हात्रे, कीर्ती ठाकूर, रंजित ठाकूर, अफशा मुकरी, सदानंद पाटील,मंगेश म्हात्रे आदी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपोषण स्थळी उपस्थित होते. या उपोषणाला काँग्रेस पक्षाने जाहीर पाठिंबा दिला असून ही समस्या त्वरित मार्गी न लागल्यास उपोषण अधिकच तीव्र होण्याची शक्यता आहे.